ASIRVAD MICRO FINANCE LTD
CIN U65923TN2007PLC064550
9th and 10th Floor, No 9, Club House Road, Anna Salai,
Chennai 600 002. Tamil Nadu.
Tel:044-42124493

निलामी सूचना

विशेषकर गिरवीकर्ताओं और सामान्य रूप में जनता को एतद्द्वारा सूचित किया जाता है कि निम्नलिखित अकाउंट्स में रखे गए सोने के आभूषणों की सार्वजनिक नीलामी निम्नलिखित शाखाओं पर दिनांक 24/06/2025 को सुबह 10.00 बजे से किया जाएगा. हम ऐसे डिफॉल्टर ग्राहकों के सोने के आभूषणों की नीलामी करने जा रहे हैं जिन्होंने रजिस्टर्ड पत्र द्वारा सूचित किए जाने के बावजूद अपने लोन की रकम नहीं चुकाई है. जिन आयटम्स की नीलामी नहीं हो पाएगी, उनकी नीलामी किसी अन्य दिन बिना पुन: सूचना दिए की जाएगी. नीलामी के स्थान व तिथि (अगर कोई हो) में परिवर्तनों की कोई सूचना नीलामी केन्द्र या वेबसाइट पर लगाई जाएगी तथा इस बारे में कोई अन्य सूचना नहीं दी जाएगी.

गिरवियों की सूची:

महाराष्ट्र औरंगाबाद गंगापुर औरंगाबाद-जीएल, 341460750000106, फुलंब्री-जीएल, 341490700000910, नांदेड अर्धापूर-जीएल, 341640700000684, परभणी सेलू-जीएल 341620700000992, पुणे वाघोली-जीएल, 342050700000434, सोलापूर मोहोळ-जीएल, 330180700000588, 0624, 0627, 0633, 0634, 0637, 0640, 0649, 0657, 0661, 0668, 0672, 0677, 0679, 0683,

उपरोक्त नीलामी में भाग लेने के इच्छुक व्यक्तियों को निम्नलिखित का पालन करना होगा:- इच्छुक बोलीकर्ताओं को ईएमडी के रूप में रू.10,000/- नीलामी के दिन नकद जमा कराना होगा (असफल बोलीकर्ताओं को बाद में लौटा दिया जाएगा). बोलीकर्ता को वैध पहचना प्रमाण/पैन कार्ड साथ लेकर आना होगा. अधिक जानकारी के लिए कृपया **9025401720** पर संपर्क करें.

अधिकृत अधिकारी
आशिर्वाद माइक्रो फायनांस लि.

---

pnb Housing Finance Limited
Ghar Ki Baat

परिशिष्ट -IV-A
अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com
अहमदनगर शाखा : पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि., युनिट क्र. 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा** घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे''** आणि **''जशी आहे जे काही आहे''** आणि **''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार/ जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
NHL/AHMD/0519/695666, शाखा : अहमदनगर, उमेश रमाकांत निंबाळकर / जयश्री उमेश निंबाळकर	रु. 99,38,818.08 दि. 31-01-2020 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	हॉल क्र. 2, पहिला मजला, शांभवनाथ कॉम्प्लेक्स, सीटीएस क्र. 2225 ए, दालमंडई, पिंजर लेन आडते बाजार जवळ, नगर, अहमद नगर, महाराष्ट्र-414001, अहमद नगर, भारत (850 चौ.फूट)	रु. 2917000	रु. 291700	26.06.2025	रु. 10,000	23-06-2025 दु. 12:00 ते दु. 04:00 वा.	27-06-2025 दु. 2 ते दु. 3:00 वा.	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. ****पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.
(1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्रमांक- के मध्ये केला आहे. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - **www.bankeauctions.com,** मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे **प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, संपर्क क्र. : 1800 120 8800, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाण :- अहमदनगर, दिनांक : 09.06.2025
स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

TYGER HOME FINANCE

टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : शिखर, मिठाखली सर्कल जवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009, गुजरात, भारत
कॉर्पोरेट कार्यालय : वन बीकेसी, सी-विंग, 1004/5, 10वा मजला, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई - 400 051, महाराष्ट्र, भारत.
CIN : U65999GJ2017PTC098960, वेबसाईट : www.tygerhomefinance.in

ई-लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना

टायगर होम फायनान्स प्रा. लि. (पूर्वी मे. अदानी हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे, दि. 6 जून 2024 रोजी कंपनीचे निबंधक कार्यालय, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने जारी केलेले इन्कॉर्पोरेशनचे प्रमाणपत्र नुसार, यापुढे 'टीएचएफपीएल' म्हणून संदर्भित) यांच्या प्राधिकृत अधिकारयांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत, खालील कर्ज खात्यांमधील कर्जदारांकडून कर्ज देय वसुलीसाठी, येथे नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याच्या अनुषंगाने, या मालमत्तेची **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्याचा अधिकार आहे. खालील स्वाक्षरीकार यांच्यामार्फत https://Tygerhome.procure247.com या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे विक्री केली जाईल, ज्याचे तपशील खाली दिले आहेत :

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार /जामीनदार /कर्ज करार क्र. -	स्थावर मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना दिनांक --------- थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	आरक्षित किंमत (आ. किं.) --------- बयाणा रक्कम --------- बोली वाढीव रक्कम
1	**801LAP001016759 / अमोल शंकर बोचरे / रोहिणी अमोल बोचरे**	पुढील मालमत्तेच्या संदर्भात सर्व खंड आणि तुकडे, गट क्र. 36/2/1/1 चे मोजमाप क्षेत्रफळ 4100 चौ. मी., गाव साकत खुर्द येथे स्थित, अहमदनगर ग्रामीण च्या हद्दीत. ज्याची चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : गट क्र. 36 चा प्लॉट, पश्चिम : शिव रस्ता, उत्तर : गावठाण, दक्षिण : रस्ता.	**23-नोव्हेंबर-21 रु. 2690415/- दिनांक 23-नोव्हेंबर-21 रोजी नुसार**	**रु. 3000000/- रु. 300000/- रु. 1000/-**

बयाणा सादरीकरण खाते तपशील (आ. किं. च्या 10%) एनईएफटी / आरटीजीएस	**खाते क्रमांक : ADANIH100EMDAHF001, बँकेचे नाव : आयसीआयसीआय बँक लाभार्थीचे नाव : अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा. लि., आयएफएससी कोड : ICIC0000106**
ई-लिलाव दिनांक / वेळ	**26-जून-25, सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वा.**
प्राधिकृत अधिकारी	**अजय कुमार - 9619661491 / ऋषीकेश देशमुख - 9372747352 ई-मेल आयडी : hrishikesh.deshmukh@tyger.in**

अटी व शर्ती :
ई-लिलाव **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे"** तत्वावर आयोजित करण्यात येईल.

1. साइटवर तपासणी दि. 17-06-2025 आणि 24-06-2025 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 4.30 वा. करता येईल.
2. ऑनलाइन बोली (बयाणा रक्कम) / **ऑफर दि. 10-जून-25 रोजी सुरू होईल आणि दि. 25-जून-25 रोजी सायंकाळी 5:30 पूर्वी संपेल.**
3. प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार तेथे कोणत्याही मालमत्तेवर भार नाही. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मालमत्तेवरील भार, नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे / हक्क / देणी यासंबंधित स्वतंत्र चौकशी करावी.
4. ज्या इच्छुक बोलीदारांनी ईएमडी जमा केला आहे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बिडिंग प्रक्रियेचे प्रशिक्षण इत्यादीसाठी आवश्यक सहाय्य हवे आहे, त्यांनी मे. आय-सोर्सिंग टेक्नॉलॉजीज प्रा. लि. 603, सहावा मजला शिखर कॉम्प्लेक्स, नवरंगपुरा, अहमदाबाद 380 009, गुजरात, भारत यांचेशी संपर्क साधावा.

ई-मेल आयडी : **Karan@procure247.com, Rajesh@procure247.com, Tapan@procure247.com,** सपोर्ट हेल्पलाइन क्र. : **राजेश चौहान - 6354910183, करण मोदी - 7016716557. चौकशी : Helpdesk@procure247.com, आणि कोणत्याही मालमत्तेशी संबंधित प्रश्नांसाठी प्राधिकृत अधिकारी : अजय कुमार - 9619661491, ई-मेल आयडी : ajay.kumar2@tyger.in** आणि **ऋषीकेश देशमुख - 9372747352 ई-मेल आयडी : hrishikesh.deshmukh@tyger.in** यांच्याशी सोमवार ते शनिवार कामकाजाच्या वेळेत संपर्क साधू शकता.
(तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया https://adanihousing.procure247.com या वेबसाइटला भेट द्या)

टीप : ही सूचना सरफेसी कायदा, 2002 अंतर्गत वैधानिक 15 दिवसांची विक्री सूचना आहे.
स्वा/- प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : महाराष्ट्र / दिनांक : 10.06.2025
भाषांतर त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य धरण्यात येईल.
टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

ॲसेटस् रिकव्हरी शाखा: छत्रपती संभाजीनगर,
प्लॉट नं. ०३, पहिला मजला,
सहकार बँक कॉलनी, शाहनूरवाडी, दर्गाह रोड,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.
Email Id: arb.aurangabad@unionbankofindia.bank

ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या ई-लिलावासाठी १५ दिवसांची विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह.

तमाम जनता तसेच कर्जदार आणि जामिनदार यांना कळविण्यात येते की, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केलेली **युनियन बँक ऑफ इंडिया** यांच्याकडे तारण असलेल्या मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार **ताब्यात घेतलेल्या मालमत्तेची** खाली नमूद केलेली येणे बाकी त्यावरील भविष्यातील व्याज व इतर खर्च याची वसुली करण्यासाठी ई-ऑक्शन पद्धतीने मालमत्तेची विक्री करण्याचे ठरवले आहे. सदर मालमत्ता बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी **'जशी व जेथे आहे'** आणि **'जे काही आहे'** आणि **'आमच्यावर विना अवलंबित'** तत्त्वावर कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानीशिवाय विक्री (ई-ऑक्शन) करण्याचे ठरवले आहे. खाली दिलेल्या मालमत्तेचा ऑनलाईन ई-ऑक्शनद्वारे ऑनलाईन पद्धतीने **https://baanknet.com** या वेबसाईटद्वारे खाली नमूद केलेली थकबाकी त्यासोबत त्यावरील व्याज व इतर खर्च वसुलीसाठी दिनांक २६-०६-२०२५ रोजी जाहीर लिलाव केला जाणार आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/ जामिनदार	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत आणि बयाणा रक्कम	व्याजासहीत थकबाकी	शाखेचे नाव व संपर्क क्रमांक	बोलीची वाढीव रक्कम	ताब्यातील प्रकार
१	मे. साईराज मोटर रिवायंडिंग ॲण्ड मशिनरी, प्रोप्रा. श्री. राहुल आबासाहेब जांभळकर (कर्जदार/गहाणदार) श्री. भरत दादा अनारसे (जामिनदार), श्री. विठ्ठल मोतीराम सरोदे (जामिनदार)	श्री. राहुल आबासाहेब जांभळकर यांची मिळकत - निवासी मोकळा प्लॉट गट नं. ११०८/७, प्लॉट नं. ५, क्षेत्र मोजमाप १९१.७२ स्क्वे. मी. गाव राशीन, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर - ४१४४०३. पुढीलप्रमाणे चतु:सिमा: पूर्व: आतील रस्ता, उत्तर: प्लॉट नं. ४, पश्चिम: गट नं.११०८/७प, दक्षिण: प्लॉट नं ६.	राखीव किंमत रु. १३,८०,०००/- बयाणा रक्कम रु. १,३८,०००/-	रु. २०,७१,१७९.८४/- (वीस लाख एकाहत्तर हजार एकशे एकोणऐंशी रुपये व चौऱ्यांशी पैसे मात्र) दि. ३०.०६.२०२३ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	ARB CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (9561610798)	१४०००/-	प्रतिकात्मक
२	श्री. विठ्ठल शंकर माने (कर्जदार) श्रीमती सुवर्णा विठ्ठल माने (सहकर्जदार)	श्री.विठ्ठल शंकर माने यांची मिळकत-निवासी घर बांधीव एनए प्लॉट नं. २३, गट नं. ८०२/८०३/२३, क्षेत्र १६८.६० स्क्वे.मी. बिल्टअप क्षेत्र १६३.८० स्क्वे.मी., माने निवास, इंद्रप्रस्थ पार्क, श्रीगोंदा रोड, मु.पो. काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. काष्टी-४१४७०१. पुढीलप्रमाणे चतु:सिमा: पूर्व: १२ मीटर आतील रस्ता, दक्षिण: गट नं. ८०२/८०३/२४, पश्चिम: गट नं. ८०१ भाग, उत्तर: ॲमिनिटी जागा.	राखीव किंमत रु. १८,९५,६७०/- बयाणा रक्कम रु. १,८९,५६७/-	रु.२३,३३,३१२/- (तेवीस लाख तेहतीस हजार तीनशे बारा रुपये मात्र) दि. ३०.०३.२०२४ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	ARB CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (7588165834)	१९०००/-	प्रत्यक्ष
३	मयत श्री. रवीकिरण रंगनाथ गवंडी (कर्जदार), श्री. अमोल रंगनाथ गवंडी (सहकर्जदार) श्री. सचिन रंगनाथ गवंडी (सहकर्जदार) श्री. दिनेश रंगनाथ गवंडी (सहकर्जदार), श्री. शिवाजी गोविंद साबळे (जामिनदार)	मयत श्री.रवीकिरण रंगनाथ गावंडी, श्री.सचिन रंगनाथ गावंडी, अमोल रंगनाथ गावंडी व दिनेश रंगनाथ गावंडी यांच्या मालकीची मिळकत- जमीन व इमारत सिसनं. ३०४४/१ व ३०४४/१ जमीन व घर मोजमाप १०९.०४ स्क्वे.मी. व ९.४ स्क्वेमी.अनुक्रमे चंद्रशेखर चौक, राम मंदिरजवळ, संगमनेर बु., ता.संगमनेर, जि.अहमदनगर. चतु:सीमा: पूर्व: गावठाण रस्ता, पश्चिम: लहामगे व श्री. ढोरे यांचे घर, उत्तर: श्री. अरुण गावंडी यांचे घर, दक्षिण: गावठाण रस्ता.	राखीव किंमत रु. ३३,६९,४००/- बयाणा रक्कम रु. ३,३६,९४०/-	रु. २७,६३,१८०/- (सत्तावीस लाख त्रेसष्ट हजार एकशे ऐंशी रुपये मात्र) दि. ३०.०९.२०२१ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	ARB CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (7588165834)	३४०००/-	प्रतिकात्मक
१	मे. श्री लक्ष्मी बँगल्स प्रोप्रा. संजय प्रभाकर डिकेकर (कर्जदार)	संजय प्रभाकर डिकेकर यांच्या मिळकत - निवासी सिटीएस नं. ४९ जीपीएम नं. ६२४/१ व ६२४/२ क्षेत्र १८५.८७ स्क्वे.मी. राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर. चतु:सीमा: पूर्व: सामायिक जागा, पश्चिम: संजय सुळ यांची मालमत्ता, उत्तर: सामायिक जागा, दक्षिण: रस्ता.	राखीव किंमत रु. १२,७५,०००/- बयाणा रक्कम रु. १,२७,५००/-	रु. ३८,२४,३४६.०७ (अडोतीस लाख चोवीस हजार तीनशे सेहचाळीस रुपये व सात पैसे मात्र) दि. ३१.०३.२०२१ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	ARB CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (7588165834)	१३०००/-	प्रत्यक्ष

ई-लिलावाच्या अटी व शर्ती १) लिलाव / बोली ही फक्त ऑनलाईन इलेक्टॉनिक मोडद्वारे वेबसाईट https://baanknet.com द्वारे होईल की जे ई लिलावाच्या संपूर्ण प्रक्रीयेची व्यवस्था व समन्वय ई लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करतील. २) ही विक्री सिक्यूरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व २०१६ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदींनुसार काटेकोरपणे होईल. ३) लिलाव **दि. २६/०६/२०२५** दुपारी १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत दर दहा मिनीटांच्या अमर्याद बोली विस्ताराने होईल. म्हणजेच ई लिलावाची बोली मुदत ही प्रत्येक बोली बोलल्यानंतर आपोआप दर १० मिनीटांनी वाढेल. ४) परिक्षणासाठी संपर्क तपशील - इच्छुक निवीदाकार मालमत्तेच्या परिक्षणासाठी व लिलावासंदर्भात अधिक माहितीसाठी शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधू शकतात. ५) वर नमूद मालमत्तांवरील बोजा बँक / शाखेला माहीत नाही. निवीदाकारांना सल्ला देण्यात येतो की, ई लिलावात भाग घेणे व त्यांची निविदा सादर करण्यापूर्वी ई लिलाव विक्रीच्या अटी, शर्ती व अन्य तपशीलासाठी बँकेची वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/auction-property/view-auction-property.aspx and www.unionbankofindia.co.in ला भेट द्यावी.

सही/-
अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

छत्रपती संभाजीनगर
दि. ०६/०६/२०२५

(हे मराठी भाषांतर असून, मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य.)

पावसाळी अधिवेशन संपताच प्रभाग रचनेचा कार्यक्रम

राधाकृष्ण विखे यांचे सुतोवाच; स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जिल्ह्यात भाजपचा 'शत प्रतिशत'चा नारा

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी 'शत प्रतिशत भाजप'चा नारा देतानाच विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जूनला संपताच लगेचच प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर होईल, असे सूतोवाचही केले आहे.

भाजपच्या मंडलाध्यक्षांसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा नगर शहरात आज, सोमवारी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते (शहर), दिलीप भालसिंग (दक्षिण) व नितीन दिनकर (उत्तर), युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अजय अक्षय कर्डिले, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, अरूण मुंडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपच्या कार्यशाळेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे भाषण झाले.

मंडलाध्यक्षांनी प्रत्येक प्रभागाच्या रचनेसाठी चौघांची समिती करावी, त्यांच्यामार्फत प्रभाग रचनेचा अभ्यास करावा, म्हणजे प्रभाग रचनेच्या वेळी पक्षाला त्याचा उपयोग होईल, अशी सूचनाही मंत्री विखे यांनी केली. कार्यशाळेनंतर मंडलाध्यक्षांची त्यांनी स्वतंत्र बैठक घेत सूचनाही केल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक कार्यकर्त्यांची असल्याने आपण कार्यकर्त्यांना बळ देण्यास कमी पडणार नाही, अशी हमीही त्यांनी दिली.

दोन्ही ठाकरे, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले तरी अडचण नाही

दोन्ही ठाकरे, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का ? याची चिंता भाजपच्या कार्यकर्त्यांनी करू नये. ते एकत्र आले काय किंवा बाजूला राहिले काय, आपल्याला काही अडचण नाही. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यासाठी सक्षम आहेत. आपला एकच नेता आहे ते म्हणजे नरेंद्र मोदी. अवांतर गोष्टींची चिंता करू नये, असेही आवाहन मंत्री विखे यांनी केले. तत्पूर्वी पत्रकारांशी बोलताना दीड कोटी सदस्य असलेल्या भाजप पुढे ते काय आव्हान उभं करू शकणार, असाही प्रश्न विखे यांनी केला.

आमदारांचीही अनुपस्थिती

कार्यशाळेस भाजपचा एकही विद्यमान व माजी आमदार उपस्थित नव्हता. आमदार विक्रमसिंह पाचपुते उपस्थित होते, मात्र मंत्री विखे यांच्या आगमनापूर्वीच ते नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंद्याकडे रवाना झाले.

पदाधिकारी गैरहजर

कार्यशाळेस जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. मात्र नगर शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व मंडलाध्यक्षांनी कार्यशाळेकडे पाठ फिरवली. नूतन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या नियुक्तीला आक्षेप असल्याने हे जुने पदाधिकारी अनुपस्थित राहिल्याची चर्चा होत होती. कार्यशाळेस उपस्थित एका माजी नगरसेवकाने तर कार्यशाळेला अनुपस्थित राहण्याचे दूरध्वनीही केले गेल्याची माहिती 'लोकसत्ता'ला दिली.

भाजप कार्यकर्त्यांकडून प्रश्नांचा भडीमार

स्वबळावर लढा, आमदार मदत करत नाहीत, जुना-नवा वाद करू नका

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : आमदार भाजप पक्ष संघटना वाढीसाठी मदत करत नाहीत, आगामी निवडणुका स्वबळावर लढा, शासकीय समित्यांवर नियुक्त करताना नवा-जुना वाद करू नका, असे अनेक हरकतीचे मुद्दे भाजपच्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे उपस्थित केले.

भाजप पदाधिकाऱ्यांच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत मंत्री विखे यांनी पक्ष संघटनेबाबत पदाधिकाऱ्यांनी सूचना कराव्यात, असे आवाहन करताच कार्यकर्त्यांनी आक्षेपांचा भडीमार केला. अनिल गट्टानी यांनी महापालिकेत कोणाबरोबरही युती-आघाडी नको, भाजपने स्वबळावर निवडणुका लढवावी, अशी मागणी केली. अरुण जगताप यांनी श्रीगोंद्यात नव्या-जुन्या वादाचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला व कमी मतदान झाल्याचे सांगत आमदारांच्या चुकीबद्दल कार्यकर्त्यांना जबाबदार धरू नका, असाही उल्लेख केला. पारनेरचे विलास हारदे यांनी निवडून आलेले पक्ष वाढीसाठी मदत करत नाहीत, आमदार केवळ स्वतःकडे पाहतात, पक्षाकडे नाही, अशी खंत व्यक्त केली. मंडलाध्यक्षांमार्फत शासकीय समित्यांवरील नावे मागवली जातील, मंडलाध्यक्षांनी कोण पक्षात येण्यास इच्छुक आहेत, याची माहिती घ्यावी. कोणी ताकतवर असेल तर त्याचा वेगळा विचार केला जाईल. मात्र, इतर कोणी येत असेल तर त्याला प्रथम पक्षात काम करा, असा सल्ला दिला जाईल, असेही विखे म्हणाले.

एक व्यक्ती-एक पद

विविध शासकीय समित्यांचे सदस्य, विशेष कार्यकारी अधिकारी, जिल्हा व तालुका संघटना कार्यकारिणीवरील नियुक्ती ३० जूनपर्यंत पूर्ण होतील, असे सांगताना मंत्री विखे यांनी त्यासाठी मंडलाध्यक्षांकडे जे फॉर्म दिले आहेत. त्यावर लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या मतदानाच्या टक्केवारीनुसार या नियुक्त्या केल्या जातील, असाही उल्लेख केला. ज्यांना पक्ष संघटनेत स्थान मिळेल, त्यांना समितीत नाही, असाही उल्लेख त्यांनी केला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये एक व्यक्ती-एक पदची अस्वस्थता निर्माण झालेली जाणवली.

कामे आमदारांमार्फत

भाजप पदाधिकाऱ्यांच्या कामाबद्दल पोलीस अधिकारी, प्रशासनातील अधिकारी यांना सूचना देण्याची मागणी मंत्री विखे यांच्याकडे करण्यात आली. संगमनेरमधील महिला पदाधिकाऱ्याने जेथे पक्षाचे आमदार नाहीत, तेथे मंत्री विखे यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी केली. त्यावर बोलताना विखे म्हणाले जेथे पक्षाचे आमदार आहेत तेथे आमदारांमार्फत कामे होतील. माझ्याकडे थेट येण्याऐवजी आमदारांमार्फत यावे. जेथे पक्षाचे आमदार नाहीत तेथे मी थेट लक्ष घालेल. संगमनेरमधील आमदार अमोल दाते आपलेच आहेत. आपणच त्यांना शिवसेनेत पाठवले आहे.

उखलगावमध्ये अतिवृष्टी; शेतकरी वाहून गेला

कर्जत : श्रीगोंदा तालुक्यात उख्खलगाव परिसरात अतिवृष्टीने ओढ्याला आलेल्या पुरात भाऊसाहेब हरिभाऊ कोरेकर (वय ४२) हा शेतकरी वाहून गेला. नंतर त्याचा मृतदेह आढळला. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी कोरेकर कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले तसेच पाझर तलावाचा भरावही खचला.

श्रीगोंदा-पारनेर-नगर तालुक्याच्या सीमारेषेवरील उख्खलगाव येथे रविवारी दुपारी अवघ्या दोन तासांतच १०० मिमी पाऊस झाला. पीक व रस्ते पाण्याखाली गेले. पाझर तलाव क्रमांक एकच्या मातीचा भराव साडेगावाजवळ खचला. त्यामुळे वाळके मळ्याशी गावाचा संपर्क तुटला होता. यावेळी शेतकरी भाऊसाहेब कोरेकर हे ओढ्याच्या पलीकडे असलेल्या शेळ्यांचा जीव वाचवण्यासाठी गेले.

सर्व शेळ्या घेऊन ते परत येत असतानाच पुराच्या पाण्यात वाहून गेले. या पावसाने फळबागांचे मोठे नुकसान झाले. आमदार पाचपुते यांनी आज सोमवारी उख्खलगावला भेट देत दिली व शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या तसेच कोरेकर कुटुंबीयांना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन निधी व मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी चर्चा केल्याचे सांगितले.

पावसाच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : जिल्ह्यात पावसाने झालेल्या नुकसानीचा स्थायी आदेशाच्या पलीकडे जावून मदतीचा विचार असून, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. जास्तीतजास्त नुकसान भरपाई देण्याचा सरकार प्रयत्न करेल, अशी ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी देतानाच सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले.

तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाववाडी, अस्तगाव येथे चक्रीवादळसदृश पावसाने डाळिंब, आंबा, ऊस आणि साठवलेल्या कांद्याचे तसेच घरांवर व गोठ्यांवर झाडे पडून नुकसान झाले. या नुकसानग्रस्त भागाला विखे यांनी आज सोमवारी भेटी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. सरकार नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही दिली. झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करा, वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ वापरा, अशा सूचना विखे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

मंत्री विखे यांनी भाऊसाहेब विनायक म्हस्के यांची कांदाचाळ, डाळिंब उत्पादक राहुल सुरेश कसाब आणि डाळिंबरत्न बी. टी. गोरे यांच्या डाळिंब बागेच्या नुकसानीची पाहणी केली. प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पाहणी दरम्यान विखे यांनी डाळिंब उत्पादकांशीही संवाद साधला. राहुल कसाब यांची फळबाग पूर्णपणे भुईसपाट झाली आहे, या बागेची पुन्हा बांधणी करण्यासाठी काय करता येईल, याविषयी डाळिंबरत्न डॉ. बी. टी. गोरे यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आंबा, कांदा उत्पादकांना देखील या वादळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. चाळीत असलेला कांदा आणि त्यावर पडलेल्या झाडांमुळे पूर्णपणे भिजलेल्या कांद्याचे पंचनामे करून अहवाल त्वरित पाठवण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

वीजपुरवठा सुरळीत करा

मंत्री विखे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत ज्या ठिकाणी पंचनामे करण्यास अडचणी आहेत, मदत देण्यात अडचणी आहेत, यासंदर्भात आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याशी बोलून नुकसान भरपाई कशी मिळेल, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. वादळाने वीजपुरवठा दोन दिवसांपासून बंद आहे. तो तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणने प्रयत्न करण्याचे निर्देश विखे यांनी दिले. आपत्ती नैसर्गिक असली तरी, भविष्यात नुकसान कसे टाळता येईल, यावर उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रासहल

श्रीरामकृष्ण : चारधाम- त्रियुगी नारायणसह- ०८.०९.२०२५// शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमा- २५.१०.२०२५// १५.११.२०२५. त्रिस्थळी यात्रा- आयोध्या- काशी- नैमिष्यारण्य- ०३.१०.२०२५// २५.१०२०२५// कर्नाटक दर्शन- ०४.१०.२०२५// कुरवपूर पिठापूर यात्रा- ०६.१०.२०२५// २७.१०.२०२५// सिक्कीम- दार्जिलिंग- भूतानसह- २८.१०.२०२५// आयोध्या- नेपाळ- मुक्तिनाथसह- ०४.१०.२०२५// ०१.११.२०२५// कर्नाटक दर्शन- कुर्गसह- ०४.१०.२०२५// २६.१०.२०२५ कोकणातील श्रीरामकृष्ण आनंदवन. बापट- 9820023106/ 9137001395.

0070945299-13

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.